क्रमांक : १३६९५ /क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ४ ऑगस्ट, २०२६

: : कार्यालयीन आदेश : :

या सचिवालयातील 'सहायक कक्ष अधिकारी' (गट-ब) (अराजपत्रित) (एस-१६:४४९००-१४२४००) संवर्गातील सरळसेवा/ मर्यादित विभागीय परिक्षेच्या कोट्यात रिक्त झालेल्या पदांवर लिपिक-टंकलेखक संवर्गात कार्यरत खालील कर्मचाऱ्यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | लिपिक-टंकलेखकांची नावे | |
|---|---|---|
| १) | श्री.सुदर्शन सु.मयेकर | |
| २) | श्रीमती सुप्रिया म.दळवी | |
| ३) | श्री.योगेश रा.उपळकर | सद्य:स्थितीस मा.अध्यक्ष, म.वि.स. यांचे आस्थापनेवर उसनवार तत्वावर कार्यरत |
| ४) | श्री.पंढरीनाथ रा.कदम | |
| ५) | श्री.रोहित प्र.पिंपळे | |
| ६) | श्री.विकास ना.पाटील | सद्य:स्थितीस मा.समिती प्रमुख, अल्पसंख्याक कल्याण समिती यांचे कार्यालयात स्वीय सहायक पदावर कार्यरत |
| ७) | श्री.सचिन वि.परब | |
| ८) | श्री.विवेक व.कांबळे | |
| ९) | श्री.शैलेश श.शेडगे | सद्य:स्थितीस मा.समिती प्रमुख, रोजगार हमी योजना समिती यांचे कार्यालयात स्वीय सहायक पदावर कार्यरत |
| १०) | श्री.अभिषेक ग.लाऊत्रे | |
| ११) | श्री.चेतन ब्र.गांवकर | सद्य:स्थितीस मा.सभापती, म.वि.प. यांचे आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत |
| १२) | श्री.विकास मा.शिंदे | सचिव-१ यांचे कार्यालयात कार्यरत |
| १३) | श्री.नयन वा.कांबळे | सद्य:स्थितीस मा.समिती प्रमुख, मराठी भाषा समिती यांचे कार्यालयात स्वीय सहायक पदावर कार्यरत |
| १४) | श्री.सचिन सो.फाळके | |
| १५) | श्री.देवेश अ.पेशने | |
| १६) | श्रीमती श्रृती सौ.काकिर्डे | |
| १७) | श्री.प्रसाद मा.पाटणकर | सद्य:स्थितीस मा.उपाध्यक्ष, म.वि.स. यांचे आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत |
| १८) | श्रीमती वनिता वि.नाईक | |

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सदर पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३. सर्व संबंधित लिपिक-टंकलेखक यांना सहायक कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

(१) सदर पदोन्नती सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील सरळसेवा/ मर्यादित विभागीय परिक्षेच्या कोट्यातील रिक्त पदावर प्रशासकीय निकड म्हणून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

(२) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित लिपिक-टंकलेखक यांना नियमित पदोन्नतीचे तसेच सेवा ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(३) सदर पदोन्नती सरळसेवा/ मर्यादित विभागीय परिक्षेच्या कोट्यातील पदावर तदर्थ स्वरुपात देण्यात येत असल्याने संबंधित पदावरील उमेदवाराची नियुक्ती झाल्यानंतर या आदेशातील कनिष्ठतम कर्मचाऱ्यास पदोन्नती कोट्यात रिक्त जागा उपलब्ध नसल्यास 'लिपिक-टंकलेखक' पदावर पदावनत करण्याच्या अधीन देण्यात येत आहे.

(४) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ कर्मचारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी 'सहायक कक्ष अधिकारी' संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम कर्मचाऱ्यास 'लिपिक-टंकलेखक' पदावर पदावनत करण्याच्या अधीन देण्यात येत आहे.

(५) सदर तदर्थ पदोन्नती सरळसेवा/ मर्यादित विभागीय परिक्षेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यात येईपर्यंत किंवा प्रतिनियुक्तीवरील अधिकारी रुजू होईपर्यंत किंवा पदोन्नतीच्या आदेशापासून ११ महिन्यांसाठी यापैकी जे आधी घडेल, त्या कालावधीसाठी असेल.

(६) सदर तदर्थ पदोन्नती ही निव्वळ प्रशायकीय निकड म्हणून देण्यात येत असल्याने सदर आदेशातील कर्मचारी या सचिवालयात पदोन्नतीच्या पदावर रूजू झाल्यानंतरच सदर पदोन्नतीचे आदेश अंमलात येतील.

३/..

(७) सदरहू तदर्थ पदोन्नती निव्वळ प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत सदर आदेशामधील कर्मचाऱ्यांना स्थायित्व प्रमाणपत्र मिळण्याच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( घ.ज्ञा.देबडवार)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

उपरोक्त सर्व संबंधित लिपिक-टंकलेखक.

**प्रतिलिपी :-**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
४) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय
५) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
६) मा.समिती प्रमुख यांचे कार्यालय
७) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
९) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
१०) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
११) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१३) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
१४) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१५) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१६) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय. (संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत)
१७) वैयक्तिक नस्ती
१८) निवडनस्ती